नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 29/12/2021 (बुधवार)
(दुपार)

---

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. भिवापुर :- अंतर्गत भिवापुर जवळी रोड येथे दिनांक 28/12/2021 चे 10:58 वा. दरम्यान आरोपीने आपले ताब्यातील एमएच- 31/सीएस- 2426 क्रमांकाच्या टाटा मॅजीक वाहन भरघाव वेगााने व निष्काळजीपणे चालवुन एम एच- 40/सीबी- 4353 क्रमांकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे- बंडु नारायन राजनहीरे, वय 42 वर्ष, रा. आलेसुर ता. भिवापुर हे गंभीर जखमी होवुन मरण पावले.

सदर प्रकरणी सरतर्फे सहायक फौजदार राजेंद्र डहाके पो.स्टे. भिवापुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री महेश भारटेकर हे करीत आहे.

2) पो.स्टे. कन्हान :- अंतर्गत 05 कि. मी. अंतरावरील कन्हान ते तारसा खंडाळा ता. पारशिवनी येथे दिनांक 27/12/2021 चे 20:30 वा. ते 20.45 वा. दरम्यान एम.एच- 40/एम- 6505 क्रमांकाचा ट्रक हा बंद स्थितीत कन्हान कडे जाणा-या अवस्थेत कोणत्याच प्रकारचे रिफलेटर(रेडीयम) किंवा ईडिकेटर चालु न ठेवता कोणत्याच प्रकारची सुरक्षा व्यवस्था न करता आम रोडवर आपले ट्रक उभे केले. त्यादरम्यान एमएच- 40/एजी- 9197 क्रमांकाच्या मोटरसायकल वाहन चालकास सदर ट्रक दिसुन न आल्याने उभा बंद असलेल्या एम.एच- 34/एम- 6505 क्रमांकाचा ट्रकला मागुन धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे- इरफान उसमान खान, वय 24 वर्ष, रा. विवेकआनंद नगर कन्हान यास ट्रकचा मार डोक्याला लागल्याने मोटरसायकल चालक हा जागेवरच मरण पावला. तर मोटरसायकल मागे बसलेले ईतर दोन इसम नामे- जुम्मन बशीर पठान, वय 19 वर्ष, रा. कन्हान व मो. फायक महफुस अहमद, वय 21 वर्ष, रा. कामठी हे गंभीर जखमी झाले जखमीचा उपचार सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- अमजद हसन खान पठान, वय 43 वर्ष, रा. न्यु मार्केट कन्हान यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री विलास काळे हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 34 कि. मी. अंतरावरील मौजा वलनी तांडा दिनांक 28/12/2021 चे 12.00 वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय 16 वर्ष ही आपल्या शेतात गायीचे वासरू बांधण्याकरिता गेली असता आरोपी नामे– रामु हरिचंद पवार, वय 29 वर्ष, रा. वलनी तांडा ता.हिंगणा जि.नागपुर याने फिर्यादीचा हात पकडुन बाजुच्या शेतात नेवुन तिचे मनास लज्जा वाटेल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 354 भादंवी. सहकलम 12 बाल लैंगीक अत्याचार कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आले असून असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि पुनम कोरडे पोस्को सेल काटोल मो.क्र. 7276330455 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर